नियमित फौजदारी खटला नं.७०/२०२२
निशाणी- २३

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.**3** चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः- प्रशांत शिवाजी त्रींबके

वयः- ५५ वर्षे, धंदाः- व्यवसाय

राहणारः- मार्केडेय सोसायटी, गुलमोहर रोड, अहमदनगर

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-</u>

१. मी मार्केडेय सोसायटीमध्ये घर क्र. २९ मध्ये राहतो. माझ्या शेजारी गोटी बामन सर आणि समोर विक्रम रघुनाथ मकासरे हे राहतात. दि. २८/०३/२०२१ रोजी रात्री ११.०० वा. सुमारास मकासरे यांचे घराकडुन मोठयाने ओरडण्याचा आवाज येत होता. त्यामुळे मी तेथे जाऊन बघीतले असता तेथे एकजण गाडीवर बसुन पळुन जात होता व विक्रम त्याला थांब थांब असे म्हणत होता. मी त्या माणसाला बघीतले होते. मी त्याला बघीतल्यास ओळखु शकतो तो आज न्यायालया समक्ष हजर नाही. मी नंतर त्यांचे घरी जाऊन काय झाले असे विचारले असता आश्वीनी मकासरे यांनी सांगितले की, 'घरात येऊन त्यांचा हात धरला आणि ओढत होता'. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली. आरोपी हा विलास साळवे होता.

<u>उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. के. डी. तरकसे यांचेकडूनः-</u>

२. मी २० वर्षापासुन इलेक्ट्रानिकचे काम करतो. मला दोन वर्षापासुन कमी ऐकायला येते. पळुन जाणारा व्यक्ती व विक्रम यांचेमध्ये १० ते १२ फुटाचे अंतर होते. त्यावेळी मी व विक्रम शेजारी शेजारी होतो. हे म्हणणे खरे आहे की, गाडीवरुन पळुन जाणा-या व्यक्तीची मला पाठ दिसत होती. मी विलासला पहिल्यापासुन ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, पळुन जाणारी व्यक्ती विलास होती ही बाब मला फिर्यादी व त्याचे पतीने सांगितली.

३. मार्केडेय सोसायटीमध्ये ३२ घरे आहेत. मकासरे व माझ्या घराच्या बाजुला

चार घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर चार घरे हाकेच्या अंतरावर आहेत. सदर आरडा ओरडा ऐकल्यानंतर घोडके यांचे घरातील सर्व लोक आले होते. घोडकेनी आरोपीला पळुन जाताना बघीतले किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, घोडकेचे घर माझ्या घरापेक्षा मकासरेच्या घराशेजारी आहे. माझे घर मकासरेच्या घरासमोर एक घर सोडुन आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की,मी पळुन जाणा-या व्यक्तीचे रंग वर्णन पोलिसांना तपासा दरम्यान सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्याचेकडे गाडी कोणती होती त्याने कोणते कपडे घातले होते हे सुध्दा मी पोलिसांना तपासा दरम्यान सांगितले नव्हते व पोलिसांनी सुध्दा मला विचारले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मार्केडेय सोसायटीच्या परिसरामध्ये पथदिवे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्या पथदिव्यापैकी किती चालु होते व किती बंद होते हे मला सांगता येणार नाही.

५. माझी व मकासरे यांची २५ वर्षापासुन ओळख आहे त्यामुळे आमचे चांगले मैत्रीचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०३/२०२१ रोजी रात्री ११.०० वा. मी मकासरे यांचे घरी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मकासरे यांचे घराकडुन मोठयाने ओरडण्याचा आवाज आला नाही, त्यामुळे मी तेथे जाऊन बघीतले नाही व तेथे एकजण गाडीवर बसुन पळुन जात नव्हता व विक्रम त्याला थांब थांब असे म्हणत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या घरात गेलो नाही, तिने मला एकजण तिच्या घरात आला व तिचा हात धरुन ओढत होता असे सांगितले नाही.

६. मी पोलिसांना जबाब देताना माझ्या शेजारी गोटी बामन सर आणि समोर विक्रम रघुनाथ मकासरे हे राहतात आणि एकजण गाडीवर बसुन पळुन जात होता व विक्रम त्याला थांब थांब असे म्हणत होता असे सांगितले होते. सदर बाब माझ्या बयानात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की,सदर बाब मी पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की,मकासरे व मी चांगले मित्र असुन आज रोजी सोबत आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द काय जबाब दयायचा याबाबत

आमची चर्चा झाली व त्यानुसार मी आज जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज मकासरे यांचे सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.11.14 11:10:54 +0530

(एल.एस.पाढेण)

दि.१२/११/२०२५. मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.